महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५०७०६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

जावक क्रमांक : तंशिविकापु/विवि/सर्वसाधारण/२०२०/१३५७ दिनांक : १४.०३.२०२०

**अत्यंत तातडीचे**

प्रति,
प्राचार्य / संचालक
**पुणे विभागातील महानगरपालिका, नगरपालिका व नगरपंचायत क्षेत्रातील**
या विभागीय कार्यालयाचे अधिनस्त सर्व व्यावसायिक व अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या संस्था

**विषय : कोरोना विषाणू (कोव्हिड १९) चा प्रादूर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेबाबत.**

संदर्भ :१. मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्रमांक कोरोना/२०२०/प्र क्र ५८/आरोग्य ५ दिनांक १४/०३/२०२०.
२. मा उपसचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग,यांचे पत्र क्रमांक, संकिर्ण-२०२०/(सं.क्र.(४०९/२०)/तांशि-१ दिनांक १४/०३/२०२०.
३. मा संचालक तंत्रशिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक २अ/एडीएम/२०२०/१४८ दिनांक १४/०३/२०२०.

कोरोना विषाणूच्या (कोव्हिड१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाने राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३/०३/२०२० पासून लागू केलेला असून, त्यातील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमित केलेली आहे.

कोरोना विषाणूचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून शासनाने संदर्भिय पत्रान्वये राज्यातील सर्व महानगरपालिका, सर्व नगरपालिका व सर्व नगरपंचायत क्षेत्रातील सर्व सरकारी व खाजगी शाळा तसेच महाविद्यालये व आयुक्त, व्यावसाय व प्रशिक्षण केंद्र यांचे आस्थापनेवरील शैक्षणिक संस्था साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसुचना व नियमावली मधील तरतुदीनुसार दिनांक ३१/०३/२०२० पर्यत बंद ठेवण्याबाबत सुचीत करण्यात आलेले आहे.

त्या अनुषंगाने या विभागीय कार्यालयाचे अधिनस्त असलेल्या सर्व शासकीय, अशासकीय अनुदानीत व विनाअनुदानीत व्यावसायिक पदविका, पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था दिनांक ३१/०३/२०२० पर्यत बंद ठेवण्यात याव्यात. त्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या विभागीय कार्यालयास तात्काळ सादर करावा.

तसेच आपणास असेही सुचीत करण्यात येते की, संस्थेतील आजारी विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांच्या संपर्कात येणार नाही, यासाठी आवश्यक ती दक्षता व खबरदारी संबधीत संस्था प्रमुखांनी यावी.

(डॉ दि. रा. नंदनवार)
प्र सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत १. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई (कार्यासन क्रमांक २अ) यांना माहितीस्तव सादर.
२. मा.आयुक्त विभागीय आयुक्त कार्यालय, विधानभवन पुणे ४११ ००१ यांना माहितीस्तव सादर.

Scanned with CamScanner